

डॉ.सर्वपल्ली
राधाकृष्णन

यांना जयंती निमित्त

विनम्र अभिवादन..!

तसेच

शिक्षक दिन

निमित्त सर्व शिक्षक व विद्यार्थांना

हार्दिक शुभेच्छा..!

लोकमंगल ITI Industrial Training Institute

औद्योगिक प्रशिक्षण संस्था

वडाळा, उत्तर सोलापूर , सोलापूर.

# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

वडाळा:- श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये 5 सप्टेंबर शिक्षक दिन उत्साहा मध्ये साजरा करण्यात आला ,भारताचे माजी उपराष्ट्रपती, माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जन्म दिवस आपल्या भारत देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. दरम्यान लोकमंगल आयटीआयच्या २०२३-२४ बॅचच्या विद्यार्थ्यांचा अभीमुकता कार्यक्रम (ओरिएंटेशन प्रोग्रॅम) चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री योगेश गायकवाड यांनी भूषवले, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून शासकीय (महिलांसाठीची) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय श्री अमर जाधव सर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बार्शी येथील गटनिदेशक माननीय श्री एच एम केकन सर आणि सिंहगड कॉलेज सोलापूर येथील प्रोफेसर माननीय श्री अविनाश लावीस सर हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री योगेश गायकवाड सर यांनी अतिथींची ओळख करून दिली तसेच त्यांना व्याख्यानासाठी आवाहन करण्यात आले ,प्रमुख अतिथी श्री अमर जाधव सर यांनी त्यांच्या व्याख्याना द्वारे विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना आयटीआय केल्यानंतर देश विदेशामध्ये नोकरीच्या संधी, व्यावसायिक संधी, आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्किल डेव्हलपमेंट करण्याचा त्यांनी सल्ला दिला. त्यानंतर श्री एच एम केकन सर यांचे पीपीटी प्रेझेंटेशन द्वारे व्यक्तिमत्व विकास आणि स्किन डेव्हलपमेंट या विषयावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयटीआय मध्ये डिझेल यांत्रिकी व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या कू.स्वप्निल मुळे आणि कू.विवेक मोठे या दोन विद्यार्थ्यांनी केले, तसेच आभार प्रदर्शन श्री बाळासाहेब जाधव सर यांनी केले, कार्यक्रम स्थळी लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निदेशक श्री आकाश राठोड सर, सौरभ दहीटनकर सर, रमेश लवटे सर, संध्याराणी शिंदे मॅडम, अरुणा कोरे मॅडम, संभाजी जाधव सर, त्याचबरोबर आयटीआय मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या ११२ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

(वृत्त :- संभाजी जाधव)










Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
B.Sc. Pass
2 Years
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
12th Pass (Commerce)
3 Years
D.Pharm
AICTE, PCI, DTE. MSBTE, Mumbai.
12th Pass (PCB or PCM Group)
2 Years
B.Pharm
4 Years
BEFORE
NOW
realme
Shot by @kshu_